दैनिक
# सह्याद्रीचा राखणदार
www. sahyandrinews.com
• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •
• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ ले • अंक १५५ • Title - Code :- MAHMAR49513 • गुरुवार दि.७ मार्च २०२४ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

# सदनिका घोटाळ्यात मुख्यमंत्र्याचा वरदहस्त आहे का?

# वडेट्टीवार यांची मुंबई महानगरपालिकेतील त्या अधिकाऱ्यांची बदली करण्याची मागणी; निवडणूक आयोगाला पत्र

**मुंबई-मुंबई महानगर पालिकेतील सनदी अधिकारी ठाण मांडून बसले आहेत. निवडणूक आयोगाने सांगून देखील या अधिकाऱ्यांच्या बदल्या का होत नाहीत. मुख्यमंत्र्यांवर या अधिकाऱ्यांनी दबाव आणला आहे का? मुख्यमंत्र्यांचा कोणी हात धरला आहे का? असे प्रश्न उपस्थित होत आहेत. त्यामुळे सरकारने या अधिकाऱ्यांच्या वेळीच बदल्या केल्या पाहिजेत तरच मुंबईतील निवडणुका फ्री अँण्ड फेअर वातावरणात पार पडतील असा, जोरदार हल्लाबोल विधानसभा विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी सरकारवर केला आहे. सरकार या अधिकाऱ्यांच्या बदल्या करत नसल्याने आता आम्ही केंद्रीय निवडणूक आयोगाल पत्र पाठविले असल्याचेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले.**



मुंबईतील साकीनाका येथे क्रांती नगर, बैल बाजार येथील झोपडपट्टी धारकांसाठी सदनिकांचे चावी वाटप करण्यात आले असून यामध्ये शेकडो कोटींचा घोटाळा झाला आहे. मुख्यमंत्र्यांच्या हस्ते चावी वाटप होत असताना हा घोटाळा होतो. यामध्ये मुख्यमंत्र्यांचा वरदहस्त आहे का? असा सवाल करत या घोटाळ्याची एसआयटीमार्फत चौकशी करण्याची मागणी वडेट्टीवार यांनी केली आहे.मुंबईतील प्रचितगड या शासकीय निवासस्थानी विधानसभा विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांची पत्रकार परिषद आयोजित करण्यात आली होती. या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी काँग्रेसचे नसीम खान उपस्थित होते.वडेट्टीवार म्हणाले की, मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त ईक्बाल सिंह चहल यांची बदली होत नाही. त्याचबरोबर अश्विनी भिडे, वेलारासू हे वरिष्ठ सनदी अधिकारी देखील त्याच ठिकाणी ठाण मांडून आहेत. अतिरिक्त आयुक्त सुधाकर शिंदे हे आएएएस नसताना देखील मोठ्या पदावर आहेत. हे अधिकारी मर्जीतील असल्याने ते पक्षपातीपणा करू शकतात. हे अधिकारी निधी वाटपात दुजाभाव करू शकतात. निवडणुकीदरम्यान प्रभाव पाडून शकतात. या अधिकाऱ्यांना तात्काळ कार्यमुक्त केले पाहिजे. मुंबई महापालिका आता भ्रष्टाचाराचा अड्डा झाली आहे. मुंबई साफ करण्याचं काम काही अधिकारी करत आहेत. सरकारने याला वेळीच आळा घातला पाहिजे. भ्रष्टाचारी अधिकाऱ्यांना सरकारने पाठीशी घालू नये, असे खडे बोल देखील वडेट्टीवार यांनी सुनावले आहेत.वडेट्टीवार म्हणाले की, साकीनाका येथे क्रांती नगर, बैल बाजार येथील झोपडपट्टी धारकांसाठी मुख्यमंत्र्यांच्या हस्ते सदनिकांचे चावी वाटप करण्यात आले. या चावी वाटपात मोठा घोटाळा झाला आहे. हे चावी वाटप करताना बोगस नावे घुसविण्यात आली आहेत. त्यानंतर लगेच या सदनिकांची खरेदी केली गेली. यातील काही लोक युपी मधील आहेत. ही शासनाची फसवणूक आहे.या प्रकरणात १० कोटीच्या ५३ सदनिका संदर्भात बनावट कागदपत्रे बनवली गेली आहेत. हे हिमनगाचे टोक असून शेकडो कोटींचा यामध्ये घोटाळा झाला आहे. या संपूर्ण प्रकरणाची एसआटीमार्फत सखोल चौकशी झाली पाहिजे. या घोटाळ्याला कोणाचा आशिर्वाद आहे हे समोर आले पाहिजे. अधिकारी आणि लोकप्रतिनीधींनी संगनमताने केलेला हा घोटाळा असल्याची खरमरीत टिका वडेट्टीवार यांनी यावेळी केली आहे. काँग्रेसचे नसीम खान यांनी देखील या घोटाळ्याची उच्चस्तरीय चौकशीची मागणी केली आहे.

# विहिरीत उडी घेऊन महिलेची मुलीसह आत्महत्या

## प्रसंगावधनाने मुलाचा जीव वाचल

**मूल | प्रतिनिधी**

सावली तालुक्यातील खेडी शेतशिवारात आपल्या १३ वर्षीय मुलीला घेऊन विहिरीत उडी घेत आत्महत्या केली असल्याची हृदयद्रावक घटना घडली.दर्शनाने मुलीसह ११ वर्षीय मुलालाही सोबत घेऊन आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला.मात्र मुलाने झटका देत सुटका करून घेतल्याने त्याचा जीव वाचला.

मुल येथील रहिवासी असलेल्या दर्शना दिपक पेटकर वय ३५, समीक्षा दिपक पेटकर वय १४ व साहिल पेटकर वय ११हे खेडी येथे असलेल्या आपल्या शेतात आले.जवळच अमरदीप कोनपतीवार यांची विहीर आहे. त्या विहिरीजवळ जात मुलीला व मुलाला धक्का दिला.मुलगी विहिरीत पडली,मात्र मुलाने तावडीतून सुटत खेडी गावाकडे पळ काढला व गावात जाऊन हकीकत सांगितली.गावापासून विहिरीचे अंतर फार असल्याने लोक येईपर्यंत बराच कालावधी लोटला होता.पोलिसांच्या मदतीने मायलेकीला विहिरीतून काढून ग्रामीण रुग्णालय सावली येथे उपचारार्थ दाखल केले.परंतू डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले.आत्महत्येचे कारण समजले नसून पुढील चौकशी पोलीस निरीक्षक जीवन राजगुरू यांच्या मार्गदर्शनात सावली पोलीस करीत आहेत.



**आत्महत्येपूर्वी फोन करून नातेवाईकांना दिली माहिती..**

**आत्महत्येपूर्वी आपल्या नंदेला फोन करून माझी शेवटची भेट आहे.त्यानंतर भेट होणार नाही असे सांगितल्याची माहिती समोर येत आहे.मात्र,आत्महत्या करण्याचे नेमके कारण काय.याचा उलगडा होणे बाकी आहे.**

# अवैध रेती वाहतूक करणारा ट्रॅक्टर तहसीलदारांनी घेतले ताब्यात



उमरी पोतदार येथेही दि.१ मार्चला रात्री ८ वाजताच्या सुमारास अवैध रेती तस्करी करताना एमएच ३४ बिएफ-५१७५ व एमएच ३४-७८७५ दोन ट्रॅक्टर ताब्यात घेण्यात आले होते. त्यांचेवरही महसूल अधिनियमानुसार दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे.

**पोंभूर्णा | प्रतिनिधी**

चिंतलधाबा येथील वनविभागाच्या हद्दीतील नाल्यावरून राजरोसपणे रेतीची अवैध वाहतूक करणारा ट्रॅक्टर मंगळवारी सकाळी ९ वाजताच्या सुमारास तहसीलदारांनी पकडून तहसिल कार्यालयात जमा करण्यात आले आहे.

तालुक्यात रेतीघाटांचे लिलाव झालेले नाही व या दिवसात रेती उपसा पूर्णपणे बंद आहे. असे असूनही पोंभूर्णा तालुक्यातील चिंतलधाबा शिवारातील जंगलालगत असलेल्या वनविभागाच्या नाल्याच्या पात्रातून रेतीची अवैध वाहतूक होत असल्याची माहिती तहसीलदार यांना मिळताच मंगळवार दि. ५ मार्चला सकाळी ९ वाजताच्या सुमारास रोशन वासुदेव ठेंगणे यांच्या मालकीची अवैध रेती वाहतूक करणारी ट्रॅक्टर क्र. एमएच ३४ एबी २३१५ व ट्राली क्र. एमएच ३४ एपी ३४०३ पकडुन तहसीलदार शिवाजी कदम यांनी तहसील कार्यालयात जमा केले.महसूल अधिनियम १९६६चे कलम ४८(७)व (८)अन्वये दंडात्मक कारवाई कारवाई करण्यात आली आहे.पुढील कार्यवाही सुरू आहे.

# छत्रपती संभाजी महाराज यांच्या वरील टपाल तिकीटाचे ना.सुधीर मुनगंटीवार यांच्या हस्ते आज अनावरण

## छत्रपती शिवाजी महाराजांच्या दुर्मिळ पत्रांचेही होणार प्रकाशन

**चंद्रपूर | प्रतिनिधी**

राज्याचे वने, सांस्कृतिक कार्य तसेच चंद्रपूर जिल्ह्याचे पालकमंत्री ना. सुधीर मुनगंटीवार यांच्या हस्ते दि.०७ मार्च (गुरुवार) छत्रपती संभाजी महाराजांच्या जीवनावर आधारित टपाल तिकिटाचे अनावरण होणार आहे. चंद्रपूरमधील प्रियदर्शनी सभागृहात सकाळी ११.०० वाजता हा कार्यक्रम होईल.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाचे ३५०वे वर्ष राज्य सरकारच्या वतीने साजरे केले जात आहे. सांस्कृतिक कार्य मंत्री ना.सुधीर मुनगंटीवार यांच्या संकल्पनेतून गेल्या वर्षभरापासून विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. याच उपक्रमांचा एक भाग म्हणून गुरुवारी छत्रपती संभाजी महाराजांच्या जीवनावर आधारित टपाल तिकिटाचे अनावरण केले जाणार आहे. याचवेळी छत्रपती शिवाजी महाराजांच्या दुर्मिळ पत्रांचेही अनावरण होणार आहे. याशिवाय मराठेकालीन टाकसाळी संबंधीची मोडी कागदपत्रे खंड-१, ब्रेल लिपीमध्ये मुद्रित छत्रपती शिवाजी महाराज, 'महाराष्ट्र - गोंड समुदाय' हे महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर यांचेही प्रकाशन या सोहळ्यामध्ये होणार आहे. ना. सुधीर मुनगंटीवार यांच्या पुढाकाराने आतापर्यंत छत्रपती शिवाजी महाराज, शहाजीराजे भोसले, माँ जिजाऊ यांच्यावर आधारित टपाल तिकिटाचे प्रकाशन झालेले आहे. याशिवाय ना. मुनगंटीवार यांनी अधिवेशनात औरंगाबादचे नाव छत्रपती संभाजीनगर होण्यासाठी तत्कालीन सरकारसमोर मागणी लावून त्यासंदर्भात सातत्याने पाठपुरावा केला होता.आता छत्रपती संभाजी महाराजांच्या जीवनावर आधारित टपाल तिकिटाच्या माध्यमातून एक महत्त्वाकांक्षी कार्य पूर्णत्वास येणार असल्याची भावना ना.सुधीर मुनगंटीवार यांनी व्यक्त केली आहे.ना. सुधीर मुनगंटीवार यांनी घेतलेल्या अनेक ऐतिहासिक निर्णयांमुळे ऐतिसाहिक वारसा आणि परंपरेचे जतन करण्याच्या दृष्टीने सरकारने पाऊल टाकले आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाचे ३५०वे वर्ष साजरे करताना सांस्कृतिक कार्यक्रमांसह ऐतिहासिक परंपरेचे जतन करण्याच्या दृष्टीने देखील त्यांनी पुढाकार घेतला. २९ जुलै १९५३ नंतर पहिल्यांदा प्रतापगड येथील अफजलखानाच्या कबरीचे अतिक्रमण सरकारने हटवले. ५ नोव्हेंबर २०२२ ला हे अतिक्रमण हटविण्यात आले. आग्रा येथील किल्ल्यामध्ये १९ फेब्रुवारी २०२३ ला छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती अतिशय दिमाखात साजरी करण्यात आली. २ जून २०२३ ला रायगडावर साजरा झालेला छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाचा सोहळा संपूर्ण जगाने अनुभवला. महाराजांनी ज्या वाघनखांनी अफजलखानाचा कोथळा बाहेर काढला ती वाघनखे ब्रिटनच्या संग्रहालयातून भारतात आणण्याची जिद्द त्यांनी बाळगली. सातत्याने पाठपुरावा करून ब्रिटन सरकारसोबत त्यांनी सामंजस्य करार देखील केला. यासोबतच जम्मू-काश्मीर मधील कुपवाडा येथे मराठा इन्फन्ट्री सैन्य दलाच्या सहकार्याने 'आम्ही पुणेकर' या संस्थेमार्फत छत्रपती शिवाजी महाराजांच्या पाकिस्तानच्या दिशेने तलवार धरलेल्या पुतळ्याचे देखील काही दिवसांपूर्वी अनावरण झाले.छत्रपती शिवाजी महाराजांनी ज्या श्रीशैलममध्ये तपश्चर्या केली, तिथे महाराजांचे एक छोटे मंदिर होते. सरकारने तिथे भव्यदिव्य मंदिर उभे केले. १९ फेब्रुवारी २०२४ ला पोंभुर्णा येथे छत्रपती शिवाजी महाराजांच्या भव्य अश्वारूढ पुतळ्याचे अनावरण ना. सुधीर मुनगंटीवार यांनी केले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या मावळ्यांचा 'दांडपट्टा' राज्यशस्त्र म्हणून ना. सुधीर मुनगंटीवार यांनी अलीकडेच घोषित केला. याशिवाय रायगडावर शिवराज्याभिषेक मिरवणूक सोहळ्यासाठी चांदीची पालखी रायगड उत्सव समितीस भेट देणे, मुंबई येथे पुरातत्त्व विभागामार्फत आयोजित शिवकालीन शस्त्रास्त्रांचे प्रदर्शन, विशेष लोगोचे प्रसारण करून शासकीय कामकाजात त्याचा वापर आदी कल्पक कामे ना.सुधीर मुनगंटीवार पुढाकाराने करण्यात आली.

# मुल येथे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे सेवा केंद्र सुरु

## जनसंपर्क कार्यालय हे गोर गरीब जनतेच्या सेवे साठि-संपर्क प्रमुख प्रशांत कदम

### आपल्या हक्काच कार्यालय तालूक्यातील समस्या सोडविण्यासाठी सदैव तत्पर असेल-जिल्हाप्रमुख संदिप गिऱ्हे

**मूल | प्रतिनिधी**

मूल शहरात भव्य दिव्य अस शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हाप्रमुख संदिप गिऱ्हे यांच्या संकल्पनेतुंन जनसंपर्क कार्यालयाचा भव्य उद्घाटन सोहळा शेकडो शिवसैनिकांच्या उपस्तितित संपन्न झाला.

या प्रसंगी कार्यक्रमाचे उदघाटक चंद्रपूर जिल्हा संपर्क प्रमुख प्रशांत कदम यांनी उद्घाटन प्रसंगी आपले विचार व्यक्त करतांना मुल शहर येथील जनसंपर्क कार्यालयाच्या माध्यमातून पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी शासकीय योजना सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहचवून व सर्वसामान्य जनतेचे प्रश्न सोडवून शिवसेना(उ.बा.ठा.)पक्ष अधिक बळकट करण्यासाठी प्रयत्न सर्वांनी करा.राज्यात सरकार कुणाची भाजपा ची की भ्रष्ट लोकांना सोबत घेऊन वाशिंग मशीन मध्ये धुतलेल्या ग्यारंटी सरकारची असा सवाल यावेळी बोलताना केला. जनसंपर्क कार्यालय हे जनसेवेचे केंद्र बनावे असे प्रतिपादन प्रशांत दादा कदम यांनी केले.



ज्यांचे सकल्पनेतुन साकार झालेले भव्य दिव्य कार्यालय च्या उद्घाटन प्रसंगी मार्गदर्शन करताना शिवसेना जिल्हाप्रमुख संदिप गिऱ्हे यांनी या जनसंपर्क कार्यालयाच्या माध्यमातून सर्वसामान्य गोर गरीब जनतेच्या प्रश्नांना न्याय देण्याचे काम केले जाणार आहे.शासनाच्या विविध योजना या कार्यालयाच्या माध्यमातून सर्व सामान्य जनतेपर्यंत पोहचवल्या जाणार असून याचा लाभ जनतेला दिला जाणार आहे. हे कार्यालय विकासाचे केंद्र बिंदू ठरेल असे काम या कार्यालयाच्या माध्यमातून होईल आणि शिवसेना (उ.बा.ठा.)पक्ष मुल शहरात तालुक्यात मजबूत करण्याचे आवाहन पदाधिकाऱ्यांना केले.अबकी बार भाजपा हद्दपार,महाविकास आघाडीचाच उमेदवार बल्लारपुर मूल विधानसभा मधुन निवडून आणणार असा संकल्प त्यांनी व्यक्त केला.या उदघाटन समारोह प्रसंगी उपजिल्हा प्रमुख सिक्की यादव, प्रा.शलिक फाले,पक्ष मजबूत करण्यासाठी मार्गदर्शन केले.कार्यक्रमास उपस्थित प्रमोद पाटील,पोंभूर्णा तालुका प्रमुख आशिष कावटवार,शहर प्रमुख गणेश वासलवार, गोंडपीपरी तालुका प्रमुख सूरज माडूरवार, चंद्रपूर तालुका प्रमुख विकास विरुटकर तालुका प्रमुख प्रकाश पाठक ,महिला संघटीका कल्पना गोरघोटे,मनस्वी गिऱ्हे,उपस्थित होते.या कार्यक्रमाचे आयोजन शिवसेना तालुका प्रमुख प्रशांत गट्टूवार यानी केले तर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी युवा सेना तालुका प्रमुख रीतिक संगमवार ,शहर प्रमुख आकाश राम ,युवा सेना शहर प्रमुख अमित अयलानी, ज्येष्ठ शिवसैनिक महेश चौधरी,तालुका संघटक रवि शेरकी,शंकर पाटेवार, वाढई,सुनील काळे मनोज मोहूले, संदीप निकुरे, सागर देऊरकर,रीतिक मेश्राम,शुभम आकुलावार,चेतन मुंगमोडे,छोटू आगबत्तुनवार नयन यलचलवार,विनोद चलाख,किरण शेंडे,शरद आत्राम,महिला आघाड़ी रजनी झाडे अंजु कुनघाडाकर शामल बोबाटे,शालू बोबाते दामोदर रेड्डीवार,रूपेश जांबूलवार,प्रमोद ठाकुर, टिपुल चावरे,विनोद कोमलवार

व आदी शेकडो मुल तालुक्याचे शिवसैनिक आजी माजी पदाधिकारी महिला आघाडी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सह्याद्रीचा राखणदार



# विठ्ठलवाडा केंद्राला लागु होणारी समूह शाळा योजना रद्द करा

## चिमुकल्या विद्यार्थ्यांची निवेदनातून मागणी ; तहसीलदाराला दिले निवेदन

**गोंडपिपरी । सूरज माडूरवार**



शासन महाराष्ट्रभरात कमी पटसंख्या असलेल्या तब्बल ६२ हजार शाळा बंद करण्याचा निर्णय घेतला. गाव खेड्यातील गोरगरीबांच्या मुलाने शिक्षण घेऊच नये अशी व्यवस्था करणारा हा निर्णय असल्याने विद्यार्थ्यांसह ग्रामस्थ शासनाच्या या निर्णयाचा विरोध केला.समूह शाळा योजना बंद करून गावातील जिल्हा परिषद शाळा सुरू ठेवण्याबाबतचे निवेदन गोंडपीपरीचे तहसीलदार शुभम बाहकर यांना देण्यात आले आहे.

महाराष्ट्र शासनाने चंद्रपूर जिल्ह्यातिल चिंचाळा व विठ्ठलवाडा केंद्रातील तब्बल सहा शाळा समूह शाळा योजनेतर्गत प्रायोगिक तत्वावर राबविण्याचे ठरविले आहे.त्या अनुषंगाने विठ्ठलवाडा केंद्रातील जि.प.प्राथ.शाळा कोरंबी, चकविठ्ठलवाडा,नवेगाव (वा), येनबोथला,नांदगाव(फु), जि.प.प्राथ.शाळा, तारसा (बूज) या ६ शाळेचा समावेश आहे. सदर शाळेपैकी ४ शाळेची पटसंख्या २१ च्या वर आहे.येनबोथला गावातील जि.प.प्राथ शाळा विठ्ठलवाडा येथे जोडल्यास येनबोथला ते विठ्ठलवाडा हे अंतर ४ किमी आहे.असे झाल्यास विद्यार्थ्यांच्या वाहतुकीचा प्रश्न निर्माण होईल. इयत्ता १ ते ४ च्या विद्यार्थ्यांचे प्रवास करण्याचे वय नाही.तसेच विद्यार्थ्यांचे वय कमी असल्यामुळे प्रवास करणे अवघड ठरणार आहे. प्रवासामुळे विद्यार्थ्यांच्या शिक्षणात देखील खंड पडू शकतो. त्यामुळं विद्यार्थी कायमचे शिक्षणाच्या प्रवाहातून बाहेर फेकले जातील, त्यामुळे सर्वागीण विचार करून येनबोथला येथील पालक व ग्रामस्थ यासह शाळा व्यवस्थापन समिति पदाधीकारी यांचे सह अन्य पाच शाळानी शाळा समूह योजना रद्द करण्याबाबत ठराव घेतला.मुले गावातील जि.प.प्राथ.शाळेतच शिकतील अन्यथा मुलांना बाहेरगावी शिकण्यास पाठवणार नसल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.येंनबोथलां गावाजवळून वैंनगंगा नदी वाहते.दरवर्षी पावसाळ्यात या नदीला पूर येतो. गावालां जोडणारा मुख्य मार्ग ठप्प पडतो. दरम्यान तालुका मुख्यालयाशी संपर्क तुटतो.पुरामुळे गावाला बेटाच स्वरूप येत.अशा वेळी प्रशासनाची मदत पोहचणे कठीण असते. विठ्ठलवाडा गावाला जोडणारे रस्त्यावरील छोटे नाले व पुल तुडूंब भरुन वाहतात. अश्यावेळी नदी व पुल ओलांडून पाण्यातून समायोजन केलेल्या शाळेत जाणे लहान बालकांना धोकादायक ठरू शकते. प्रसंगी जीव जावू शकतो. त्यामुळे शासनाने विचार करून जिल्हा परिषद प्राथमिक शाळा येंनबोथलाचे समायोजन करू नये अशी मागणी दि.४ सोमवारी शीं विरोधातील निघालेल्या आंदोलनादरम्यान आंदोलनात भाग घेत ग्रामस्थांनी,चिमुकल्या विद्यार्थ्यांनी तहसीलदारांकडे मागणी केली आहे.

# गोहत्येस पाठीशी घालणाऱ्या पोलीस अधिकाऱ्यावर कारवाई करा

## अन्यथा विश्व हिंदू परिषदेचा आंदोलनाचा इशारा



**सेनगाव । प्रतिनिधी**

गोहत्या बंदीवर पोलीस अधीकरी सबसेल अपयशी ठरत असल्याने गोहत्याचे प्रमाण वाढत आहे. कसायांना पाठीशी घालणाऱ्या संबधीत पोलीस अधिकाऱ्यावर कारवाई करून जिल्ह्यात नोडल अधिकाऱ्यांची नियुक्ती करावी अन्यथा विश्व हिंदू परिषदेच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा बुधवारी जिल्हाधिकारी कार्यालयात निवेदनाद्वारे दिला आहे.

जिल्हाधिकारी कार्यालयाकडे दिलेल्या निवेदनात नमूद केले की, प्राणी संरक्षण कायद्याची कठोर अंमलबजावणी होत नसल्यानेच राज्यात दररोज हजारो गोवंस्याची कत्तल केले जाते आहे. तसेच परराज्यात देखील निर्दयी पणे गोवंस्याची वाहतूक होत आहे. पोलीस प्रशासन याकडे दुर्लक्ष करीत असल्याने असे प्रकार वारंवार होत आहेत. पोलिसांनी कारवाई करण्याऐवजी गोपालक किंवा बजरंग दलाच्या कार्यकर्त्यांकडून गोवंस्याची निर्दयी वाहतूक करणारे ट्रक पकडल्या जाते. त्यानंतर पोलिसांना जाग येते. मार्गदर्शक सूचनांची देखील पोलीस प्रशासनाकडून अंमलबजावणी केली जात नाही. असा आरोप करून गोवंशाची वाहतूक करणाऱ्या मालका ऐवजी केवळ ट्रक चालकांवर गुन्हा दाखल केला जातो.बहुतांश पोलीस हे यामध्ये कसायाना मदत करतात त्यामुळे दोषी कर्मचाऱ्यांना पाठीशी घातले जाते.यावर अंकुश घालण्यात पोलीस प्रशासन सबशेल अपयशी ठरत असल्याचा आरोप करीत यापुढे प्रत्येक जिल्ह्यात नोडल अधिकारी यांची नियुक्ती करावी, त्यानंतरही गोहत्या होत राहिल्यास संबंधित पोलीस अधिकाऱ्यांवर कारवाई करावी अन्यथा लोकशाही मार्गाने आंदोलन करण्याचा इशारा विश्व हिंदू परिषदेने दिला आहे.निवेदनावर विहिप जिल्हाउपाध्यक्ष सावरमल अग्रवाल, बद्रीनारायण सारडा, विभाग धर्म प्रसार प्रमुख राजेंद्र हलवाई, ताराचंद धुत, प्रकाश सोनी, ज्ञानेश्वर महाराज, अमोल देशमुख, महेश बियाणी, विजय शिंदे, मोहन चव्हाण, छत्रपती पोले, राम हाराळ, शैलेश नांदेडकर, विश्वनाथ बोराळे, यांच्यासह बजरंग दल, विश्व हिंदू परिषदेचे कार्यकर्ते आदींची उपस्थिती होती.

# उदनवाडी गावच्या सरपंच,उपसरपंच पदी शेकापचे सौ.वलेकर व भाई.आलदर

**सांगोला । प्रतिनिधी**



उदनवाडी गावच्या सरपंच पदी शेतकरी कामगार पक्षाच्या सौ.विद्यादेवी संजय वलेकर यांची तर उपसरपंचपदी श्री बाळासाहेब विलास आलदर यांची बिनविरोध निवड करण्यात आली.उदनवाडी ग्रामपंचायती मध्ये शेतकरी कामगार पक्षाचे तेरा सदस्य असुन सरपंच पद हे महिलेसाठी राखीव असल्याने व पाच वर्षात पाच महिलांना संधी देण्याचे ठरल्याप्रमाणे.. विद्यमान सरपंच सौ.कुसुम अशोक वलेकर व उपसरपंच श्री लक्ष्मण मारकड यांनी आपल्या पदाचा राजीनामा देत पक्षाने सांगितल्या प्रमाणे शब्द पाळला गेला ..व सदर जागेवरती सौ.वलेकर व श्री आलदर यांची बिनविरोध निवड करण्यात आली.. उदनवाडी गाव हे आजतागायत स्व गणपतरावजी देशमुख ऊर्फ आबासाहेब यांच्या वर नितांत निष्ठा व श्रध्दा बाळगणारे गाव आहे.पुरोगामी युवक संघटनेचे प्रदेशाध्यक्ष डॉ भाई बाबासाहेब देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली सरपंच व उपसरपंच यांची निवड संपन्न झाली.येणाऱ्या काळात गावचा विकास करण्यासाठी म्हणून डॉ भाई बाबासाहेब देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली काम करणार असल्याचे नुतन सरपंच व उपसरपंच यांनी सांगितले .सदर निवडीप्रसंगी मावळते सरपंच उपसरपंच व ग्रा.पं.सदस्य उपस्थित होते.सदर निवड बिनविरोध पार पाडण्यासाठी उदनवाडी गावातील शेतकरी कामगार पक्षाचे पंचायत समिती आजी माजी सदस्य, आजी माजी सरपंच व सर्व ग्रामपंचायत सदस्य,विकास सोसायटीचे आजी माजी चेअरमन व्हा चेअरमन व सदस्य तसेच शेतकरी कामगार पक्षाचे जेष्ठ नेते पुरोगामी युवक संघटनेचे युवा कार्यकर्ते यांनी परीक्षम घेतलेसदर निवडणूक पार पाडण्यासाठी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून बराडे मॅडम व ग्रामसेवक जयवंत लवटे यांनी काम पाहिले.सदर निवडीनंतर डॉ भाई बाबासाहेब देशमुख यांच्या शुभहस्ते सरपंच उपसरपंच यांचा सत्कार करण्यात आला

# इनरव्ही क्लब ऑफ सांगोला यांच्यावतीने जिल्हा परिषद शाळा नायकुडे वस्ती येथे मुलांना वह्या व स्कूल बॅग वाटप

**सांगोला । प्रतिनिधी**

इनरव्हील क्लब ऑफ सांगोला यांच्यावतीने जिल्हा परिषद शाळा नायकुडे वस्ती येथे शाळेतील मुलांना इनरव्ही क्लब यांच्याकडून वह्या वाटप करण्यात आले व हर्षदा गुरुमिळे यांनी त्यांची मुले सोहम व दूर्वा यांच्या वाढदिवसानिमित्त स्कूल बॅग देण्यात आल्या या कार्यक्रमासाठी क्लबचे अध्यक्ष सौ सविता लाटणे माधुरी गुरुमिळे वंदना माहीमकर शैला गुरुमिळे हर्षदा गुरमीळे शाळेतील मासाळ मॅडम कुलकर्णी मॅडम व मोठ्या प्रमाणात विद्यार्थी उपस्थित होते कार्यक्रमाच्या शेवटी मॅडमने सर्वांचे आभार मानले





# हिस्सी गावात सिमेंट कॉंक्रेट रसत्याचे उदघाट्न



**सेलू । प्रतिनिधी**

सेलू तालूक्यातील हिस्सी गावात सिमेंट कॉंक्रेंट रसत्याचे उदघाट्न करण्यात आले.

अनेक वर्षा पासून गावकरी यांच्या मागणी पूर्ण करत शिवसेना पक्षाच्या वतीने आज हिस्सी येथे ज्ञानेश्र्वर गात यांचे घर ते देविचे मंदिर या रोडचे पाच लाख रकमेच्या रोडचे उदघाटन करण्यात आले .यावेळी मा. आ. हरिभाऊ लहाणे, बाबा काटकर शिवसेना ता.प्रमूख सेलू संतोष गात. सरपंच दीपक गोरे अविनाश शेरे, तुकाराम रोडगे, बालासाहेब मगर, मधुकर कवडे ,कृष्णा मगर, अच्युत कवडे, बाळासाहेब गात, रंगनाथ गात, सुंदर गायकवाड, गोपाळ पवार, भास्कर गात, बालासाहेब गवळी, रमेश राव कवडे, दिनकर मगर, सूभाष बोरकर ,भीमसेन शिंदे, सिद्धू मगर, मुरलीधर गोरे, शिवाजी गोरे, गावातील नागरीक आदीची उपस्थीती होती,

## मराठा आरक्षणाचा प्रश्न मार्गी लागत नाही तोपर्यंत पुढार्यांना गाव बंदी

# वडवणी शहरात सकल मराठा समाजाच्या बैठकीत संघर्ष योद्धा मनोज सारंगे पाटील यांनी मोबाईल द्वारे साधला संवाद

**वडवणी । प्रतिनिधी**



सकल मराठा समाज वडवणी तालुका बैठक मंगळवार दि.०५ मार्च २०२४ रोजी आनंद मंगल कार्यालयात संपन्न झाली, बैठकीत सगेसोयरे ची अंमलबजावणी जो पर्यंत सरकार करत नाही तोपर्यंत मराठा समाजाने कोणत्याही राजकीय पक्षाच्या व्यासपीठावर जायचे नाही तसेच राजकीय पुढारी यांना गाव बंदी तसेच लोकसभा निवडणुकीत उमेदवार उभा करणे यासह इतर अनेक ठराव घेण्यात आले तसेच यावेळी मोबाईल वरून संघर्ष योध्दा मनोज जरांगे पाटील यांनी उपस्थित मराठा समाज बांधवांसोबत संवाद साधला.

मराठा आरक्षण योध्दा मनोज जरांगे पाटील हे मराठा समाजाला राज्य सरकारने दिलेला सगेसोयरे अमंलबजावणीचा शब्द पुर्ण करावा यासाठी संघर्ष करत आहेत तरी वडवणी तालुक्यातील सकल मराठा समाजाच्या वतीने मंगळवार दि.०५ मार्च २०२४ रोजी सकाळी ११:०० वाजता महत्वपूर्ण बैठकीचे आयोजन करण्यात आले होते यावेळी मराठा समाज आक्रमक झाल्याचे पहावयास मिळाले यामध्ये जो पर्यंत सगेसोयरे अध्यादेशाची राज्य सरकार अंमलबजावणी करत नाही तोपर्यंत कोणत्याही राजकीय पक्षाच्या व्यासपीठावर समाजाने जाऊ नये, तसेच गाव पुढारी यांनी कोणत्याही राजकीय पक्षाच्या पुढारी यांना गावात आणू नये तसेच गाव बंदी करावी तसेच येणाऱ्या लोकसभा निवडणुकीत उमेदवार उभा करण्यात यावेत तसेच इतर अनेक ठराव घेण्यात आले यावेळी या बैठकीत मराठा समाज बांधवांशी मनोज जरांगे पाटील यांनी मोबाईल वरून संवाद साधला व लवकरच वडवणी तालुक्याला भेट देणार असे सांगितले.तरी यावेळी बैठकीला वडवणी तालुक्यातील हजारोंच्या संख्येने सकल मराठा समाज बांधव उपस्थित होते.

# शेवगाव येथे कर्तृत्ववान महिलांचा सन्मान सोहळा आणि सांस्कृतिक महोत्सवास महिलांचा उत्स्फूर्त सहभाग

## खा.डॉ.सुजय विखे पाटील यांनी 'मैं हू डॉन..'गाण्यावर धरला ठेका

**शेवगाव । प्रतिनिधी**

काल जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने शेवगाव येथे आयोजित करण्यात आलेला कर्तृत्ववान महिलांचा सन्मान सोहळा आणि सांस्कृतिक महोत्सव–२०२४ महिलांच्या उत्स्फूर्त सहभागात संपन्न झाला. शेवगाव येथील खंडोबा मैदानात संपन्न झालेल्या या सोहळ्यास महिलांनी तुफान गर्दी करत या कार्यक्रमाचा आनंद घेतला.





यावेळी विविध क्षेत्रांमध्ये नावलौकिक करणाऱ्या कर्तृत्ववान महिलांचा सन्मान खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी त्यांनी उत्सवमूर्ती महिला भगिनींचे अभिनंदन करत त्यांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. तसेच उपस्थित असंख्य महिलांना योग्य ते मार्गदर्शन करून मोठ्या संख्येने उपस्थित राहिल्याबद्दल आभार मानले.या कार्यक्रमात भव्य लकी ड्रॉ, पैठणी आणि बरच काही.. या थीम अंतर्गत विविध स्पर्धांचे देखील आयोजन करण्यात आले होते. यामधे महिलांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला आणि अनेक महिला या आकर्षक बक्षिसांच्या मानकरी देखील ठरल्या. या कार्यक्रमाचे खास आकर्षण म्हणजे प्रसिद्ध पार्श्वगायक सुदेश भोसले यांनी आपल्या आवाजाच्या जादूने उपस्थितांची मने जिंकली. तसेच अभिनेत्री अमृता खानविलकर देखील आपल्या नृत्यातून प्रेक्षकांवर भुरळ घातली. यासोबतच महाराष्ट्राचे हास्यवीर सुनील पाल, रोहित माने आणि शिवाजी परब यांनी आपल्या विनोदाने प्रेक्षकांना खळखळून हसवत त्यांच्या मनात स्थान निर्माण केले.अतिशय मनोरंजनात्मक आणि खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न होत असणाऱ्या या कार्यक्रमात खासदार सुजय विखे पाटील यांनी देखील 'मै हु डॉन..' या गाण्यावर ठेका धरत उपस्थितांचा आनंद द्विगुणित केला. सदरील कार्यक्रमात कोरोना काळात अमूल्य योगदान देणाऱ्या डॉ. विजया फळके, कृषी खात्यातील अधिकारी या नात्याने शासनाच्या विविध योजना प्रभावीपणे शेतकऱ्यापर्यंत पोहोचविणाऱ्या सविता सानप, बचत गटाच्या माध्यमातून महिलांना सक्षम करणाऱ्या उषाताई होळकर, झाडू कामगार असूनही मुलांना उच्च शिक्षण देऊन समाजात आदर्श निर्माण करणाऱ्या पवित्राबाई कुसळकर, शिक्षणाप्रती समाजजागृती करणाऱ्या कमरूनिसा सालार शेख, समाजसेवेसाठी नेहमी पुढे असणाऱ्या शामा गांधी, प्रामाणिकपणे एसटी बस वाहक म्हणून सेवा देणाऱ्या सुवर्णा देवकाते, महिला बचत गटाच्या माध्यमातून महिलांना सक्षम बनविणाऱ्या सुवर्णा टाकळकर, अश्विनी काकडे आणि रूपाली सरोदे, पार्लरचा व्यवसाय करून यामध्ये महिलांना प्रोत्साहन देणाऱ्या सीमा लाहोटी, समुदाय संसाधन व्यक्ती (ICRP) म्हणून असंख्य महिलांना सीआयएफ (CIF) निधी उपलब्ध करून देणाऱ्या सविता भुजबळ, अश्विनी काकडे आणि सुवर्णा टाकळकर आदी कर्तृत्ववान महिलांचा सन्मान करण्यात आला.

# वाशिम येथे स्व.बाळासाहेब ठाकरे शेतकरी प्रशिक्षण व शेतमाल विक्री केंद्राचे लोकार्पण

## शेतीमालाचे मूल्यवर्धन आणि विपणनासाठी प्रशिक्षण व विक्री केंद्र उपयुक्त ठरेल–मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

**वाशिम । प्रतिनिधी**

शेतकरी बांधवांच्या उन्नतीसाठी राज्य शासन सातत्याने प्रयत्नशील असून, अनेक योजनांची प्रभावी अंमलबजावणी होत आहे. स्व. बाळासाहेब ठाकरे शेतकरी प्रशिक्षण व शेतमाल विक्री केंद्र स्थानिक शेतीमालाचे विपणन व मूल्यवर्धनासाठी उपयुक्त ठरेल, असा विश्वास मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज येथे व्यक्त केला.

वाशिम येथे स्व. बाळासाहेब ठाकरे शेतकरी प्रशिक्षण व शेतमाल विक्री केंद्राचे लोकार्पण मुख्यमंत्र्यांच्या हस्ते झाले, त्यावेळी ते बोलत होते. पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील, खासदार भावना गवळी, जिल्हा परिषदेचे अध्यक्ष चंद्रकांत ठाकरे, आमदार ड. किरण सरनाईक, महादेवराव जानकर, गोपीकिशन बाजोरिया, जिल्हाधिकारी बुवनेश्वरी एस., पोलीस अधिक्षक अनुज तारे, सहायक जिल्हाधिकारी अपूर्वा बासुर, कृषी सहसंचालक किसन मुळे, जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी आरिफ शाह, 'आत्मा'च्या प्रकल्प संचालक अनिसा इस्माईल



महाबळे आदी उपस्थित होते.मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले की, शेती क्षेत्राच्या विकासासाठी व शेतक–यांच्या आर्थिक प्रगतीसाठी एक रूपयांत पीक विमा, किसान सन्मान योजना अशा अनेक योजना राबविण्यात येत आहेत. शेतकरी बांधवांच्या पाठीशी शासन खंबीरपणे उभे आहे. स्व. बाळासाहेब ठाकरे शेतकरी प्रशिक्षण व शेतीमाल विक्री केंद्रामुळे येथील स्थानिक शेतीमालाला विक्रीची सुविधा, तसेच कृषी उत्पादनांचे मूल्यवर्धन होण्यासाठीही उपयुक्त ठरणार आहे. केंद्राच्या माध्यमातून आधुनिक तंत्रज्ञान तसेच मूल्य साखळी विकासाचे प्रशिक्षण देण्यात येऊन शेतकऱ्यांच्या नैसर्गिक व सेंद्रिय उत्पादित मालाला बाजारपेठ उपलब्ध होण्याच्या दृष्टीने कोल्ड स्टोरेज, क्लिनिंग, ग्रेडीग, पॅकेजिंगची व्यवस्था उपलब्ध करून देण्यात येणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या मालाला चांगला दर मिळून त्यांचे आर्थिक उत्पन्न वाढणार आहे.सेंद्रिय शेतीमालाची विक्री करणा–या रथाला यावेळी मुख्यमंत्री श्री. शिंदे यांच्या हस्ते हिरवी झेंडी दाखविण्यात आली. केंद्रासाठी जिल्हा वार्षिक योजनेतून ५ कोटी ८४ लक्ष निधी उपलब्ध करून देण्यात आला. त्याचप्रमाणे, अडीच कोटी रुपये निधीतून शेतकरी प्रशिक्षण गृह निर्माण करण्यात आले आहे. शेतकऱ्यांना कृषि व संलग्न विभागाच्या तंत्रज्ञानविषयक गरजेवर आधारित प्रशिक्षण देणे, नाशवंत शेतमालास बाजारपेठ उपलब्ध करून देणे हा केंद्राचा उद्देश आहे. केंद्राची क्षमता प्रीकूलिंग १० मे.टन, कोल्ड स्टोरेज ४० मे.टन, रायपेनिंग चेंबर १५ मे.टन, ग्रेडिंग अँड पॅकिंग, २ व्यावसायिक गाळे आहेत. जिल्ह्यातील एकूण ९० शेतकरी उत्पादक कंपनी, २ हजार २१४ शेतकरी उत्पादक गटांची स्थापना करण्यात आली आहे. त्याद्वारे ३० हजार २१० शेतकऱ्यांना संघटित करण्यात आले आहे.

### राज्यातील लोकसभेच्या सर्व जागा जिंकण्याचा निर्धार करा

# अकोला येथील बैठकीत केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांचा पदाधिकाऱ्यांना आदेश

**अकोला । प्रतिनिधी**

राज्यातील सर्व ४८ लोकसभेच्या जागांवर महायुतीचे उमेदवार जिंकण्यासाठी निर्धार करा, असा आदेश केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी मंगळवारी दिला. आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर विदर्भातील ६ मतदारसंघांचा आढावा घेण्यासाठी अकोला येथे झालेल्या पक्षाच्या लोकसभा निवडणूक व्यवस्थापन समितीच्या व लोकसभा कोअर कमिटीच्या बैठकीत श्री.शाह बोलत होते. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि निवडणूक व्यवस्थापन समिती, लोकसभा कोअर कमिटीचे पदाधिकारी या बैठकीला उपस्थित होते. या बैठकीत श्री.शाह यांनी अकोला, अमरावती, बुलढाणा, यवतमाळ–वाशीम, वर्धा व चंद्रपूर या मतदारसंघांतील पक्षाच्या संघटनात्मक तयारीचा आढावा घेतला.

यावेळी श्री.शाह म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आगामी लोकसभा निवडणुकीत राष्ट्रीय लोकशाही आघाडीला ४०० पेक्षा अधिक जागांवर विजय मिळेल असा विश्वास व्यक्त केला आहे. पंतप्रधान मोदी यांचा हा संकल्प प्रत्यक्षात उतरवायचा असेल तर महाराष्ट्रातील सर्व जागांवर महायुतीच्या उमेदवारांना विजयी करण्यासाठी प्रत्येकाने झटून



कामाला लागावे लागेल. कार्यकर्त्यांनी मोदी सरकारच्या कल्याणकारी योजनांच्या आणि विकासकामांच्या आधारावर मते मागायची आहेत. मोदी सरकारच्या कल्याणकारी योजना तळागाळातील जनतेपर्यंत पोहोचवण्यासाठी सर्व कार्यकर्त्यांनी घरोघरी जाऊन जनतेशी संपर्क प्रस्थापित करावा.

आपला उमेदवार विजयी होण्यासाठी प्रत्येक बूथ सशक्त करण्यासाठी आपणा सर्वांना लक्ष द्यावे लागणार आहे, असा कानमंत्रही त्यांनी उपस्थित पदाधिकारी, कार्यकर्त्यांना दिला. महायुतीचा उमेदवार हा भाजपाचाच उमेदवार आहे असे समजून एकदिलाने महायुतीच्या उमेदवाराच्या विजयासाठी अहोरात्र काम करा असेही ते म्हणाले.

मोदीजींच्या नेतृत्वाखाली देशाने आर्थिक विकासाचे नवनवे विक्रम प्रस्थापित केले आहेत. देशाच्या विकासाची गती कायम राखण्यासाठी लोकसभा निवडणुकीत एनडीए विजयी होणे आवश्यक असल्याचे मतदारांना पटवून दिले पाहिजे, असेही श्री.शाह यांनी नमूद केले.

# 'आरटीई' प्रवेशाच्या एक किमी अंतराचा घोळ शासन निर्णयाने पालकांत नाराजीचा सूर

**जिंतूर । प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील शिंदे सरकारने शिक्षण हक्क कायद्यात एक मोठा बदल केला आहे. आतापर्यंत शिक्षण हक्क कायद्यानुसार, आर्थिकदृष्ट्या मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना खासगी शाळेत २५ टक्के आरक्षित जागेवर प्रवेश मिळत होते परंतु राज्य सरकारने या कायद्यात आता बदल केला आहे.

नव्या नियमानुसार गरीब घरातील विद्यार्थ्यांना म्हणजे आर्थिक दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना त्यांच्या जवळच्या खासगी शाळेपासून एक किलोमीटर परिघात सरकारी किंवा सरकारी अनुदानीत शाळा असल्यास या शाळांमध्ये प्राधान्याने प्रवेश घ्यावा लागेल.म्हणजेच खासगी शाळांमध्ये आरटीई ( ठढए) अंतर्गत जो प्रवेश मिळत होता तो यामुळे मिळणार नसल्याचं स्पष्ट झालं आहे.राज्य सरकारच्या या निर्णयावर विविध संघटना, शिक्षण तज्ज्ञ आणि काही पालकवर्गाकडून टीका होत असून याबाबत जिंतूर तालुक्यातील जागृत पालकांनी ही जाचक अट रद्द करण्याची मागणी एका निवेदनाद्वारे ५मार्च रोजी जिंतूर तहसीलदार यांच्यामार्फत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे केली आहे. राईट टू एज्यूकेशन म्हणजेच शिक्षणाचा अधिकार कायद्याखाली आठवीपर्यंतचे शिक्षण मोफत देण्यात येते. हा कायदा शिक्षण हक्क कायदा २००९ नावाने ओळखला जातो. ४ऑगस्ट २००९ रोजी हा कायदासंसदेत मंजूर केला. या कायद्यांतर्गत महाराष्ट्रात प्रवेश प्रक्रिया राबवली जाते. आता राज्याच्या शालेय शिक्षण विभागाने आरटीईच्या कायद्यात बदल केला आहे. नवीन नियमानुसार आता एक किलोमीटर परिसरातील शासकीय, अनुदानित किंवा विना अनुदानित शाळेत आरटीई अंतर्गत प्रवेश दिला जाणार नसल्याचे नवीन परिपत्रकात सांगण्यात आले आहे यामुळे पालक वर्गामध्ये शासनाच्या या निर्णयामुळे मोठी नाराजी निर्माण झाली आहे. मराठी शाळांना घरघर लागलेली असताना इंग्रजी शाळांमध्ये पहिली ते आठवीपर्यंत विद्यार्थ्यांना मोफत शिक्षण देण्याच्या 'आरटीई' कायद्यातच आता दुरूस्ती करण्यात आली आहे. त्यामुळे पालकांमध्ये प्रचंड नाराजीचा सूर असुन जिंतूर तालुक्यातील पालकांनी केलेल्या मागणीमध्ये आरटीई कायद्यांतर्गत महाराष्ट्रातील ६ ते१४ वयोगटातील मुलांना प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे करण्यात आलेले आहे त्याचप्रमाणे २०१२–१३ मध्ये या कायद्यामध्ये सुधारणा करून इंग्रजी माध्यमांच्या शाळांमध्ये देखील आर्थिक दृष्ट्या दुर्बळ घटकातील विद्यार्थ्यांना २५% जागा राखीव ठेवण्याबाबत निर्देश दिलेले होते. परंतु याबाबत आपल्या सरकारने यावर्षी परत सुधारणा (बदल) करून २०२४–२५ या शैक्षणिक वर्षामध्ये इंग्रजी माध्यमांच्या शाळांमध्ये प्रवेश घेण्यासाठी आर्थिक दुर्बल घटकांना जर त्या इंग्रजी शाळेच्या एक किलोमीटरच्या अंतरामध्ये अनुदानित किंवा सरकारी शाळा असेल तर त्या शाळेमध्ये संबंधित विद्यार्थ्यांना २५% प्रवेश देणे त्या शाळांवर बंधनकारक राहणार नाही अशा प्रकारचा अन्यायकारक व गोरगरीब विद्यार्थ्यांना शिक्षणापासून वंचित ठेवण्याचा निर्णय घेतलेला आहे. तो तात्काळ रद्द करण्यात येवून गोरगरीब विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळण्यासाठी इंग्रजी माध्यमांच्या शाळांची दारे पुन्हा उघडी करून द्यावी अशी मागणी निवेदनाद्वारे पालकांनी केली आहे सदरील निवेदनावर गजानन वाघमारे खैरीकर अँड.माधव दाभाडे बाळासाहेब काजळे राम काजळे अमोल घुगे सुनील अंभोरे किसन खिल्लारे शकील अहमद संजय काकडे प्रताप मोरे दिलीप चव्हाण जानकीराम भराड शशिकांत कांबळे संदीप गजभारे यांच्यासह अडीचशे पालकांच्या स्वाक्षरीचे निवेदन मुख्यमंत्र्यांना पाठविण्यात आले आहे.

**सरकारच्या 'या' अधिसूचनेनंतर गरीब, मागासवर्गीय मुलांना खासगी शाळेत प्रवेशाचा मार्ग बंद?**

या अधिसूचनेनुसार, महाराष्ट्रात बालकांचा मोफत आणि सक्तीच्या शिक्षणाचा हक्क ( वंचित दुर्बल गटातील बालकांचे इयत्ता पहिली किंवा पूर्व प्राथमिक वर्ग या स्तरावर कमीत कमी २५ टक्के प्रवेश करण्याची पद्धत) नियम,२०१३ नुसार वंचित आणि दुर्बल घटकातील २५% प्रवेशाकरीता ज्या खासगी विना अनुदानीत शाळेच्या एक किलोमीटर परिसरात शासकीय शाळा आणि अनुदानीत शाळा आहेत अशी शाळा स्थानिक प्राधिकरणाकडून निवडण्यात येणार नाही.यापूर्वीच्या नियमानुसार, आर्थिक दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना त्यांच्या घरापासून ३ किलोमीटर अंतरावरील किंवा त्या परिघातील खासगी शाळेत २५ % आरईटी राखीव जागांअंतर्गत प्रवेश घेता येत होता.परंतु आता खासगी शाळांच्या एक किलोमीटर परिसरात स्थानिक स्वराज्य संस्थेची किंवा सरकारची किंवा सरकारी अनुदानीत शाळा असल्यास संबंधित विद्यार्थ्याला खासगी शाळेत प्रवेश घेता येणार नाही अशी अधिसूचना सरकारने काढल्याने यामुळे गरीब विद्यार्थ्यांचा खासगी विशेषत: इंग्रजी शाळांमधील प्रवेशाचा मार्ग यामुळे बंद होणार आहे.

### आ.बाळासाहेब आजबे यांच्या प्रयत्नातून

# आष्टी,पाटोदा,शिरूर नगरपंचायतसाठी १० कोटी रुपयेचे विकास कामांना मंजुरी

**आष्टी । प्रतिनिधी**

आष्टी,पाटोदा ,शिरूर नगरपंचायत विभागासाठी मतदारसंघाचे कर्तव्यदक्ष आमदार बाळासाहेब आजबे काका यांच्या मागणीनुसार राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस, कृषी मंत्री तथा पालकमंत्री धनंजय मुंडे यांच्या प्रयत्नातून नगर विकास विभाग महाराष्ट्र शासन यांच्या अंतर्गत ४ मार्च रोजी विविध विकास कामांना मंजूर देण्यात आली. यामध्ये आष्टी नगरपंचायत करिता ३ कोटी ४० लक्ष, पाटोदा नगरपंचायत करिता ४ कोटी रुपये,शिरूर कासार नगरपंचायत करिता २ कोटी ६० लक्ष रुपये अशा एकूण १० कोटी रुपये किमतीच्या विविध विकास कामांना मंजुरी देण्यात आली आहे. महाराष्ट्र शासनाने या विविध विकास कामांना मंजुरी मिळवून दिल्याबद्दल मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे साहेब,उपमुख्यमंत्री अजितदादा पवार,उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडवणीस,कृषी मंत्री तथा पालकमंत्री धनंजय मुंडे यांचे आष्टी,पाटोदा,शिरूर नगरपंचायतच्या वतीने आमदार बाळासाहेब आजबे यांनी आभार व्यक्त केले आहेत .



अनेक दिवसापासून आष्टी पाटोदा शिरूर नगरपंचायत मध्ये येथील जनतेकडून विविध विकास कामांचे मागणी होती त्यानुसार त्या त्या प्रभागांमधील नगरसेवक यांच्या मागणीनुसार विविध विकास कामांना आमदार बाळासाहेब आजबे यांच्या प्रयत्नातून मंजुरी देण्यात आली आहे यामुळे आष्टी नगरपंचायत पाटोदा नगरपंचायत व शिरूर कासार नगरपंचायत मधील विकास कामांना गती मिळणार आहे स्थानिक नगरसेवक व आष्टी पाटोदा शिरूर शहरातील कार्यकर्त्यांच्या मागणीनुसार ही विकास कामे होत असल्याकारणाने शहराचा चेहरा मोहरा बदलण्यास मदत होणार आहे आमदार बाळासाहेब आजबे यांनी मंजूर करून आणलेले या विकास कामाच्या निधीबद्दल आष्टी पाटोदा शिरूर नगरपंचायतचे नगरसेवक व स्थानिक कार्यकर्ते यांनी आष्टी मतदारसंघाचे कर्तव्यदक्ष आमदार बाळासाहेब आजबे यांचे आभार मानले आहेत.

# ओतूर येथे गुजराती महिलांनी केला आगळा वेगळा महिला दीन साजरा

**ओतूर । प्रतिनिधी**

ओतुर, आळेफाटा व नारायणगाव येथील गुजराती महिला मंडळ द्वारा ता. ३ मार्च २०२४ रोजी वेगळ्या प्रकारचा महिला दिन साजरा करण्यात आला. हा कार्यक्रम ओतुर येथील क्रीडा संकुलमध्ये आयोजित करण्यात आला होता. स्त्रियांच्या दैनंदिन जीवनात थोडा वेळ काढून त्यांच्या कला गुणांना वाव मिळण्यासाठी विविध उपक्रम राबवण्यात आले होते. कार्यक्रमाची सुरुवात महिला मंडळाच्या वयस्कर स्त्रियांच्या सत्कराने झाली. मानसिक आरोग्य सुदृढ राखण्यासाठी प्राणायाम व सामुहिक प्रार्थना घेण्यात आली त्यानंतर आनंदित वातावरणात व अत्यंत उत्साहात गेम्स घेण्यात आले. दुपारच्या सत्रात निसर्गरम्य वातावरणाचा आस्वाद घेत सामुहिक रित्या वनभोजन पार पडले. तद्नंतर पून्हा उर्वरित गेम्स घेण्यात आल्या. या संपूर्ण कार्यक्रमात उपस्थित प्रत्येक स्त्रिच्या चेहऱ्यावर त्या स्वातंत्र्याचे सौंदर्य दिसत होते. असे उपक्रम फक्त एक दिवसासाठी




मर्यादित नसून हे गुजराती महिला मंडळ स्त्रियांसाठी असे विविध उपक्रम नेहमीच पार पाडत असते.या वेळी मंडळाचे अध्यक्ष .लक्ष्मीबेन पटेल , उपाध्यक्ष. जशोदाबेन पटेल ,कमळाबेन पटेल , गिता पटेल ,संगिता पटेल ,निता पटेल, पूजा पटेल व पदधिकारी सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जामखेड येथील जनसेवा फाउंडेशनच्या माध्यमातून आयोजित भव्य कार्यक्रमास महिलांची प्रचंड गर्दी

**जामखेड । प्रतिनिधी**

काल जनसेवा फाउंडेशनच्या वतीने येणाऱ्या महिला दिनाच्या पार्श्वभूमीवर जामखेड येथे कर्तृत्ववान महिलांचा सन्मान आणि सांस्कृतिक महोत्सव २०२४ चे आयोजन करण्यात आले होते. जामखेड महाविद्यालय येथे हा भव्य कार्यक्रम संपन्न झाला असून यावेळी महिला भगिनींनी कार्यक्रमासाठी प्रचंड गर्दी करत उपस्थिती दर्शविली.

यावेळी विविध क्षेत्रांमध्ये आपल्या अनमोल कार्याने आपला ठसा उमटविणाऱ्या कर्तृत्ववान महिलांचा सन्मान खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी सन्मानित करण्यात आलेल्या सर्व महिला भगिनींचे खासदार विखेंनी अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा देत त्यांच्या माध्यमातून होणाऱ्या कार्याला सदिच्छा दिल्या.यावेळी महिला भगिनींचे मनोरंजन करण्यासाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन देखील करण्यात आले होते. या कार्यक्रमात भव्य लकी ड्रॉ, पैठणी आणि बरच काही.. या थीम अंतर्गत विविध स्पर्धांचे देखील आयोजन करण्यात आले होते. तसेच या कार्यक्रमाचे खास आकर्षण म्हणजे प्रसिद्ध अभिनेत्री सोनाली कुलकर्णी. सोनालीने आपल्या नृत्याने उपस्थितांची मने जिंकत हा सोहळा अधिक खास बनवला. विशेष म्हणजे जामखेड मध्ये पहिल्यांदाच असा कार्यक्रम झाला की त्या कार्यक्रमात महिलांची रेकॉर्ड ब्रेक गर्दी पाहायला मिळाली. या आधी इतक्या प्रचंड संख्येने कोणत्याच कार्यक्रमाला गर्दी पहायला मिळाली नव्हती. तालुक्यातील व जामखेड शहरातील असंख्य महिलांनी सहभागी होत या कार्यक्रमाचा उत्साह द्विगुणित केला. जनसेवा फाउंडेशनच्या माध्यमातून आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमाची संपूर्ण तालुक्यात चर्चा होत आहे. उत्कृष्ट नियोजन आणि महिलांचे संघटन काय असते हे या कार्यक्रमाकडे बघून सर्वांना समजले. मुळात म्हणजे महिला भगिनींनी अतिशय मनसोक्तपणे या कार्यक्रमाचा आनंद लुटला. तसेच ज्या महिलांचा सन्मान येथे करण्यात आला त्या महिलांकडून सर्वांनी प्रेरणा घ्यावी आणि त्या दिशेने वाटचाल करावी. मदतीसाठी विखे कुटुंबीय सदैव तत्पर आहे असे संबोधित केले.या कार्यक्रमात सामाजिक कार्यकर्त्या शोभा आरोळे, शिक्षण क्षेत्रात योगदान देणाऱ्या बेबी हसीना खान, सामाजिक कार्यकर्त्या उमा जाधव, बचत गटाच्या माध्यमातून सामाजिक कार्य करणाऱ्या मनीषा मोहळकर, नॅशनल खेळाडू माधुरी भोसले, पीएसआय गायत्री राळेभात, जनविकास सेवाभावी संस्था चालविणाऱ्या लक्ष्मीताई पवार, सामाजिक कार्यकर्त्या निलम साळवे, उत्कृष्ट शेती करणाऱ्या काजल मासाळ, बचत गटाच्या माध्यमातून अनेक महिलांचे संघटन करणाऱ्या मनिषा वडे, आधुनिक शेती आणि शेतीपूरक दूध व्यवसाय करणाऱ्या पल्लवी बरबडे, पार्वती खेतमाळस, विविध प्रकारचे मसाले तयार करणारे इंद्रजीत कांबळे, अगरबत्ती व समई वात करणाऱ्या राणी गावडे, दुग्ध प्रक्रिया उद्योग चालविणाऱ्या जयश्री बेंद्रे आदी कर्तृत्ववान महिलांना सन्मानित करण्यात आले.

# आमदार चषक;राज्यस्तरीय आमंत्रित हॉकी स्पर्धा (मुली) थाटात उद्घाटन

## विद्यार्थी जीवनामध्ये क्रीडा स्पर्धांचे महत्त्व : आमदार सुधाकर अडबाले

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

विद्यार्थी जीवनामध्ये क्रीडा स्पर्धांना अत्यंत महत्त्व आहे. शालेय जीवनातच क्रीडा स्पर्धांची आवड निर्माण झाल्यास भविष्यात उत्कृष्ट खेळाडू तयार होतील आणि ते देशाचे नाव उज्ज्वल करतील, असे प्रतिपादन नागपूर विभाग शिक्षक मतदार संघाचे आमदार सुधाकर अडबाले यांनी केले.

हॉकी प्रमोटर असोसिएशन चंद्रपूर व डेव्हलपमेंट न्ड रिसर्च एज्युकेशन सोसायटी (ड्रिम) चंद्रपूर यांच्या संयुक्त विद्यमाने आमदार सुधाकर अडबाले यांच्या पुढाकाराने लोकमान्य टिळक हायस्कूल आणि कनिष्ठ महाविद्यालय, जिल्हा स्टेडीयमच्या बाजूला चंद्रपूर येथे आयोजित राज्यस्तरीय आमंत्रित हॉकी स्पर्धा (मुली) उद्घाटन ५ मार्च रोजी सायंकाळी थाटात पार पडले. यावेळी उद्घाटक म्हणून आमदार अडबाले बोलत होते.यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून सैनिक स्कूल चंद्रपूर येथील प्रशासकीय अधिकारी कमांडर देवाशिष जेना, सेवानिवृत्त अप्पर पोलीस अधीक्षक राजेंद्र गौतम, जिल्हा कृषी अधिक्षक शंकर तोटावार, एपीआय सचिन राखुंडे, हॉकी असोसिएशनच्या उपाध्यक्ष मनीषा आखरे, संध्या टोगर, पद्मिनी सदभैये, विमाशि संघाचे जिल्हा कार्यवाह श्रीहरी शेंडे आदींची उपस्थिती होती.आमदार सुधाकर अडबाले पुढे म्हणाले, खेळामध्ये हार-जीत होत असते. पण खचून न जाता पुन्हा जोमाने प्रयत्न करीत राहिल्यास विजय हा नक्की होत असतो. अशा खेळामधून राज्य, देशाचे नेतृत्व करणारे खेळाडू तयार व्हावे, या हेतूने आपण शिक्षक आमदार म्हणून क्रीडा स्पर्धा भविष्यातही घेण्यासाठी पुढाकार घेतला जाईल.आमदार चषक हॉकी स्पर्धेत महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यातून मुलींचे संघ दाखल झाले असून रोज सायं. ६ ते रात्री १० पर्यंत सामने होणार आहे.






### ढोरवासा परिसरात उद्योगधंद्यांची निर्मिती करा

# माजी पं.स.उपसभापती नागोबा बहादे यांचे मुख्यमंत्र्यांना निवेदन

**भद्रावती । प्रतिनिधी**

भद्रावती तालुक्यातील विविध गावातील २हजार सातशे एकर जमीन औद्योगिक विकास महामंडळातर्फे गेल्या २५ वर्षांपासून संपादित करण्यात आली. मात्र या जागेवर अद्याप कोणतेही उद्योग सुरू करण्यात न आल्याने परिसरातील बेरोजगार हे रोजगारापासून वंचित झालेले आहे. त्यामुळे येथील बेरोजगारांना रोजगाराची संधी उपलब्ध व्हावी यासाठी या जागेवर उद्योग निर्मिती करावी अशी मागणी माजी पंचायत समिती उपसभापती नागोबा बहादे यांनी मुंबई येथे मंत्रालयात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना सादर केलेल्या एका निवेदनातून केली आहे.



तालुक्यातील तेलवासा, चारगाव, ढोरवासा, चिरादेवी, पिपरी रुयार रिठ, लोणार रिठ येथील २७०० एकर शेत जमीन महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळातर्फे २५ वर्षांपूर्वी संपादित करण्यात आली. मात्र या जागेवर अद्याप एकही उद्योग उभारण्यात आलेला नाही. शेतकऱ्यांची जमीनही गेली व रोजगारही उपलब्ध न झाल्याने शेतकरी आर्थिक दृष्ट्या हतबल झाला आहे. गेल्या २५ वर्षांपासून या जमिनीवर कोणताही उद्योग आलेला नाही. सदर जागेला लागून वर्धा नदीचा पुरेसा पाणीसाठा उपलब्ध असून जवळच रेल्वे लाईन असल्यामुळे ही उद्योगासाठी आदर्श जागा आहे. त्यामुळे या जागेवर उद्योगधंदे सुरू करून या परिसरात रोजगार उपलब्ध करून द्यावा अशी मागणी माजी पंचायत समिती उपसभापती नागोबा बहादे यांनी निवेदनातून केली आहे.

## आनंद निकेतन महविद्यालय १४ विद्यार्थीनींना सायकलचे वितरण



**वरोरा । प्रतिनिधी**

महारोगी सेवा समिती आनंदवन व्दारा संचालित आनंद निकेतन विज्ञान, कला व वाणिज्य महविद्यालय आनंदवन वरोरा येथे मानव विकास योजनेअंतर्गत१४ विद्यार्थीनींना सायकल मोफत देण्यात आले.

यावेळी प्राचार्य डॉ. मृनाल काळे, उपप्राचार्य राधा सवाने, कनिष्ठ लिपिक मनिषा बोंडे-मनगटे, निखिल डुकरे व ईतर शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते व विद्यार्थ्यांनींचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

# भाजपा महिला आघाडीची नारीशक्ती वंदन यात्रा



**पुलगाव । प्रतिनिधी**

भाजपा महिला आघाडी पुलगाव व नाचणगांव / गुंजखेडा मंडळाच्या संयुक्त विद्यमाने दि.५ मार्च मंगळवार रोजी सायंकाळी ५ वाजता नगरपरिषद पुलगाव येथून भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला वंदन करून नारी शक्ती वंदन यात्रेला सुरवात करण्यात आली.

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशातील सर्व महिलांच्या उन्नती करिता विशेष योजना राबविल्या, शहरातील सर्व महिलांना या योजनांची माहिती होण्याच्या दृष्टीने शहरातील मुख्य मार्गाने यात्रा नेण्यात आली. यावेळी पंतप्रधान मोदीजींना धन्यवाद देणारे फलक महिलांनी हातात धरले होते. पूलगाव शहर अध्यक्षा रिता येटीवार , जिल्हा महामंत्री माधुरी इंगळे, नाचणगांव मंडळ अध्यक्षा जयश्री मोकदम, महामंत्री शुभांगी कासार, नीलिमा पळसकर, ओबीसी मोर्चा विधानसभा प्रमुख , सर्व भाजपा महीला आघाडी पदाधिकारी आणि मोठया संख्येने महिला कार्यकर्त्या उपस्थित होत्या.

# सावरगाव येथील प्राथमिक शाळेत सामान्य ज्ञान स्पर्धेचे बक्षीस वितरण

**तळोधी (बा.) । प्रतिनिधी**

नागभीड तालुक्यातील सावरगाव येथील छत्रपती शिवाजी महाराज जयंती महोत्सव समिती तर्फे सावरगाव येथील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेतील इयत्ता ३ व ४ च्या विद्यार्थ्यांसाठी छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीचे औचित्य साधून सामान्य ज्ञान स्पर्धा आयोजित करण्यात आली होती.या स्पर्धेचा बक्षीस वितरण सोहळा मंगळवारी (दि.५ मार्च) जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेत पार पडला.



या बक्षीस वितरण कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक राजेंद्र हटवार होते.तर प्रमुख अतिथी म्हणून ग्रा.पं.सदस्य युवराज रामटेके,तळोधी पत्रकार संघाचे अध्यक्ष राजेश बारसागडे, सामाजिक कार्यकर्ते गिरीधर निकुरे,सहायक शिक्षिका वैशाली पालांदूरकर,सुरक्षा कोलप्याकवार,सहायक शिक्षक राजू शेंडे, अरुण कुंभले,माधव बोरकर यांची उपस्थिती होती. यावेळी सामान्य ज्ञान स्पर्धेत प्रथम पारितोषिक कु.प्रतीक्षा दिलीप निकुरे हिने मिळविले,द्वितीय पुरस्कार कु.पूर्वी अमृत बोरकर व कु.कनिष्का सुनील बन्सोड यांनी मिळविले तर तृतीय पुरस्कार वंचिता दिवाकर नेवारे या विद्यार्थिनीने मिळविला.या विद्यार्थिनींना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिक वितरण करण्यात आले.या कार्यक्रमाचे संचालन अरुण कुंभरे यांनी केले तर आभार राजू शेंडे यांनी मानले.

# तळोधी येथे पल्स पोलिओ लसीकरण

**तळोधी (बा.) । प्रतिनिधी**

सार्वजनिक आरोग्य विभागातर्फे दिनांक ३ मार्च २०२४ रोजी रविवारला तळोधी( बा) या गावात राष्ट्रीय पल्स पोलिओ अभियान राबविण्यात आले यावेळी अंगणवाडी केंद्र, प्राथमिक आरोग्य केंद्र अशा ठिकाणी बुथ लागलेले होते. अंगणवाडी क्रमांक ९ येथे बुथ क्रमांक ३ मध्ये ग्रामपंचायत सदस्य वर्षा शिरबांधे यांच्या हस्ते पोलिओ डोस पाजून उद्घाटन करण्यात आले.तर प्राथमिक आरोग्य केंद्रात सरपंच कल्पना मस्के यांच्या हस्ते पोलिओ पाजून उद्घाटन करण्यात आले.

यावेळेस अंगणवाडी सेविका निवृत्ता पाकमोडे व भूमिका खोब्रागडे मदतनीस यांची उपस्थिती होती. या केंद्रावर सकाळी ८ वाजेपासून तर सायंकाळी ५ वाजेपर्यंत लाभार्थ्यांना पोलिओचा डोज देण्यात आला. पोलिओच्या समुळ उच्चाटनाच्या अनुषंगाने ग्रामीण भागातील प्राथमिक आरोग्य केंद्र अंगणवाडी क्षेत्रात बस



स्थानक परिसर अशा ठिकाणी बूथ लावून पोलिओ डोस देण्यात आले.ज्या मुलांच्या पोलिओ डोज काही कारणास्तव देण्यात आला नाही त्यांना दिनांक ५ ते ९ मार्च दरम्यान आय पी पी आय आरोग्य विभाग व अंगणवाडी क्षेत्रातील कर्मचारी यांच्या वतीने घरोघरी जाऊन डोस दिला जाईल. या पोलिओ लसीकरणाच्या लाभ सर्व लाभार्थ्यांनी घ्यावा व लसीकरणाला सहकार्य करावे असे आवाहन आरोग्य विभागाने केले आहे.

## पुलगाव येथील अंकिता अमरावती विद्यापीठात सुवर्णपदकाची मानकरी



**पुलगाव । प्रतिनिधी**

येथील रहिवासी न्यायाधीश दीप्राशु तिवारी यांची पत्नी, प्रसिद्ध विधीतज्ञ अनिल तिवारी यांची सून असलेल्या अंकिता तिवारी यांनी अमरावती विद्यापीठात एलएलबी केले. त्या गुणवत्ता यादीत प्रथम आल्याने सुवर्णपदकाच्या मानकरी ठरल्या आहेत .अमरावती विद्यापीठात झालेल्या दीक्षांत समारंभात त्यांना डॉ. वेदप्रकाश मिश्रा यांच्या हस्ते सुवर्णपदक देऊन मंगळवार ५ मार्च रोजी सन्मानित करण्यात आले .

५ मार्च रोजी झालेल्या दीक्षांत समारंभात डॉ. वेदप्रकाश मिश्रा यांनी अवंतीला पदवी प्रमाणपत्र दिले. त्यांनी मिळविलेल्या या यशाबद्दल शहरातील अधिवक्ता अशोक भार्गव, माजी नगराध्यक्ष गिरीश चौधरी, सांवरिया मारोठिया, दिनेश तिवारी, ड. अली,बहादूर चौधरी, ड.लहानू खोके,अजय तिवारी, मिलिंद सागोले, ड. रिना जावधिया,रवि केशरवानी, अश्विन शहा, मुस्ताक हुसेन, प्रशांत शहागडकर, विजय राऊत,संजय शेडे ,राजू चिंचोलकर,आदींनी आनंद व्यक्त करीत कौतुक केले.

## अण्णासाहेब वाघिरे महाविद्यालयात रसायनशास्त्र विभागाकडून एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन



**ओतूर । प्रतिनिधी**

येथील अण्णासाहेब वाघिरे महाविद्यालयात आय. क्यू. एस. सी. व रसायनशास्त्र विभाग यांच्या वतीने एकदिवसीय कार्यशाळा पार पडल्याची माहिती कार्यशाळेचे समन्वयक प्रा. सौ. डुंबरे यांनी दिली.

या कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.महेंद्र अवघडे होते व प्रमुख पाहुणे म्हणून डॉ.के.डी.सोनावणे व ग्रंथपाल डॉ. हांडे उपस्थित होते. यावेळी आलेल्या पाहुण्यांचे स्वागत डॉ.कबाडी एकनाथ . यांनी केले व कार्यक्रमाचे प्रास्ताविक रसायनशास्त्र विभाग प्रमुख डॉ.शिरसाट आर .एन. यांनी केले. त्यांनी डी.एस.टी. लॅबमधील विविध अद्ययावत उपकरणांची माहिती उपस्थितांना दिली. उपप्राचार्य डॉ.के.डी.सोनावणे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. प्राचार्य डॉ.महेंद्र अवघडे यांनी विद्यार्थ्यांना संशोधन काळाची गरज याबद्दल मार्गदर्शन केले. कार्यशाळेच्या पहिल्या सत्रात विविध अद्ययावत उपकरणांची सखोल माहिती प्रा.सौ. रत्नामाला मोरे, प्रा. सौ. सुवर्णा डुंबरे, प्रा.सौ. स्वप्नाली दांगट व प्रा. श्री. मेमाणे रोहिदास यांनी विद्यार्थ्यांना दिली.

दुपारच्या सत्रात आय. क्यू. एस .सी कॉर्डिनेटर डॉ. योगेश्वर काळदंते यांनी विद्यार्थ्यांना महाविद्यालयच्या डीएसटी प्रयोगशाळेत उपलब्ध असलेल्या विविध अद्ययावत उपकरणांचे सखोल प्रशिक्षण दिले. सदर कार्यशाळेसाठी पदवी व पदव्युत्तर विभागातील विद्यार्थी सहभागी होते .विद्यार्थ्यांनी कार्यशाळेबद्दल सकारात्मक अभिप्राय दिला. सदर कार्यशाळेस प्रा. डॉ. साधू कोळेकर व डॉ.सायमा मीर हे उपस्थित होते. सदर कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी श्री. बारगळ अमोल, श्री .थोरात सुरेश, श्री. ढोमसे किरण, श्रीमती शेख टी. एन. व श्री. काकडे निखिल यांनी विशेष परिश्रम घेतले.

# भटाळा येथे अतिप्रभावीत मेगा पाणलोट प्रकल्प अंतर्गत नंदादीप गांव योजना शिवार फेरी सपन्न




**वरोरा । प्रतिनिधी**

महात्मा गांधी रोजगार हमी योजना,अक्सिस बँक फॉउंडेशन,भारत रुरल लाईव्हलिहूड फाऊंडेशन द्वारा कृषी विकास व ग्रामीण प्रशिक्षण संस्था मलकापूर यांच्या संयुक्त विद्यमानाने ता.वरोरा येथील भटाळा ग्रामपंचायत हे पंचायत समिती नंदादीप योजने साठी निवड झाली असून त्या अनुषंगाने, शिवार फेरी काढण्यात आली.

शिवार फेरी दरम्यान गावाचा शिवार पाहण्यात आला असून त्यानुसार कामाची पाहणी करून कामे घेण्यात आली.सिचन विहीर, तलाव गाळ काढणे,शेततळे, नालाखोलिकरण, मजगी, या सारखी जलसंधारण ची कामे घेऊन गावाचा जल सुरक्षा आराखडा तयार करण्यात आला व गावच्या पाण्याची पातळी घेऊन सर्व गावकरी यांच्याशी चर्चा करण्यात आली असून त्या कामामुळे गावातील पाण्याची पातळी कायम करणे व महात्मा गांधी रोजगार हमी योजना सफल करणे या योजनेतुन लोकांना प्रत्येक हाताला रोजगार मिळून देणे व सीमांत कुटुंब यांचे उत्पन्न डबल करणे तसेच प्रत्येक शेतीला पाणी व प्रत्येक हाताला काम, सिंचन विहीर घेणे,या शिवार फेरीसाठी भटाळा ग्रामपंचायत च्या सरपंच धम्मकन्या भालेराव,उपसरपंच हरिदास जाधव, ग्रामसेवक आशिष सुखदेवे, रोजगार सेवक दिलीप तुमसरे,ग्रामपंचायत सदस्य व गावकरी कृषी विकास चे टीम लीडर रोशन मानकर ,प्रबुद्ध डोये (कृषी तज्ञ),दीक्षांत राऊत (तालूका समन्वयक) श्रीपत पाटील (जलसंधारण तज्ञ ), मंगेश तुमसरे, विशाल आडे,गुरूदास चौधरी,अंकुश रामपुरे,आचल घोडमारे,पल्लवी नन्नावरे,नीलिमा वनकर, माया पोहीणकर सर्व उपस्थित होते.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.

Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .